# विदयमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांचे कार्यालय,
## निवीदा सूचना

वाचावे :- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क.Rule/X.2304/84/175, दिनांक ०९ जुन २००७

विषय :- सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाकरीता मा. उच्च न्यायालयाचे संदर्भांकीत पत्रामधील निर्देशा अंतर्गत अमरावती जिल्हयातील मुख्यालय व तालूक्याच्या ठिकाणी कार्यालयीन व न्यायालयीन कामकाजाकरिता झेरॉक्स मशीन लावणे व त्यांची दूरूस्ती व देखभाल करण्याकरीता दर पत्रक मागविण्याबाबत..

सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाचे संदर्भांकीत पत्रामधील निर्देशांचे व अटींचे अधीन राहून अमरावती जिल्हा न्यायालय येथे ४, अचलपूर, दर्यापूर, वरूड येथील न्यायालया करीता प्रत्येकी २ तसेच मोर्शी, अंजनगाव सुर्जी, धारणी, धामणगाव रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, चांदुर बाजार, भातकुली, तिवसा येथील न्यायालयाकरीता प्रत्येकी १ असे एकूण १९ न्यायालयात झेरॉक्स प्रती काढण्याकरीता झेरॉक्स मशीन उपलब्ध करून त्यांची दूरूस्ती, देखभाल, इत्यादीसह छायांकीत प्रती काढण्याचे दर करारनामा करण्याकरीता निविदा मागविण्यात येत आहे.

करीता, सदर दर करारनाम्याकरीता सोबत जोडलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून सिलबंद निविदा दिनांक २०/०३/२०२६ किंवा त्यापूर्वी सहायक अधिक्षक, रोकड व वित्त विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती यांचेकडे मागविण्यात येत आहेत.

आदेशान्वये

[signature] ५/३/२०२६

दिनांक : ०५/०३/२०२६

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती

टिप :-

१. झेरॉक्स कामकाजासंबंधीत निविदा सादर करतांना यासोबत जोडण्यात आलेल्या अटी व शर्तीचे न चुकता अवलोकन करावे.

२. बेलिफ यांना निर्देशित करण्यात येते की, सदरहु निविदा सुचना जिल्हा न्यायालय, अमरावती, दिवाणी न्यायालय, व.स्तर, अमरावती, मुख्य न्यायदंडाधिकारी कार्यालय, अमरावती, वकील संघ, अमरावती येथील सुचना फलकावर चिटकवुन प्रकाशित करण्यात यावे तसेच जिल्हा न्यायालय, अमरावती येथील वेबसाईटवर संगणक विभागामार्फत प्रकाशित करण्यात यावे.

सहपत्र :- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या पत्रानुसार निर्देशीत केलेल्या अटी व शर्ती

बेलीफ रिपोर्ट :- आज दि. ५।३।२६ रोजी सकाळी ११:०० वाजता सदर निविदा सुचना, जिल्हा व सत्र न्यायालय अम., दिवाणी न्यायालय (व) स्तर अम., मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय अम., जिल्हा वकील संघ अम. व जिल्हा व सत्र न्यायालयाचे इमारतीचे दर्शनीय भागात सुचना फलकावर प्रसिद्ध केली.

द. [signature] ५।३।२६

(नि. [illegible])

बेलीफ.

# जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती व अधिनस्थ सर्व न्यायालयातील तसेच तालुका न्यायालयातील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती, मशिन दुरूस्ती इत्यादी कामकाजाकरिता करण्यात येणा-या वार्षिक सेवा संविदा कराराच्या अटि व शर्ती

संदर्भ :- मा. उच्च न्यायालय,मुंबई यांचे पत्र क्र.Rule/X.2304/84/175, दिनांक ०९ जुन २००७

| | |
|---|---|
| १ | सदर कराराची मुदत करार अस्तीत्वात आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधी करीता असेल. |
| २ | सेवा प्रदात्याने जिल्हा न्यायालय व अधिनस्थ न्यायालयांच्या आवारात उपलब्ध करून दिलेल्या जागेवर कागदपत्राच्या (काळया/पांढ-या तसेच रंगीत) छायाप्रती उपलब्ध करून देण्या संबंधीत मशीन स्थापीत करून सेवा देणे बंधनकारक आहे. |
| ३ | फोटो कॉपी शुल्क जिल्हा न्यायालय व सेवाप्रदाता यांच्यात झालेल्या करारा मधील दराने देय राहील. |
| ४ | सेवादात्याने ग्राहकास प्रदान करावयाची झेरॉक्स प्रत ही वाचणीय म्हणजेच सुस्पष्ट असेल. ग्राहकाकडून केवळ स्वच्छ/वाचणीय झेरॉक्स करीता शुल्क आकारले जाईल. |
| ५ | झेरॉक्स सेवा देणा-या संबंधीतास त्याचे झेरॉक्स संबंधीत यंत्रसामुग्री स्थापीत केलेल्या जागी विदयुत सेवा उपलब्ध करून दिल्या जाईल, तथापी, अमरावती मुख्यालयी मासिक ३०० रू. व तालुक्याचे ठिकाणी मासिक रू. १०० प्रमाणे विदयुत देयक झेरॉक्स सेवा देणा-या संबंधीतास दरमहा भरणे बंधनकारक असेल. असे विजबील/शुल्क विहीत वेळेत त्वरीत भरावे लागतील, अन्यथा ग्राहकास अश्या न भरलेल्या विज बिलाच्या मर्यादेपर्यंत फोटोकॉपी शुल्काचे पैसे रोखण्याचे अधिकार असेल. |
| ६ | सेवा प्रदात्याने फोटोकॉपी शुल्काचे बिल दरमहा ग्राहकाकडून आकारावे आणि ग्राहकाने असे बिल अश्या रकमेच्या तारखेपासून एक महीण्याच्या आत पडताळणी करून व सेवा प्रदात्यासोबत तडजोड झाल्यानंतर प्रदान करावे. |
| ७ | झेरॉक्स मशिन व इतर संबंधीत यंत्रसामुग्रीची व त्याच्या सुटया भागाचे कोणत्याही कारणास्तव नुकसान झाले किंवा नादुरूस्त झाल्यास त्याकरीता झेरॉक्स सेवा देणारा संबंधीत जबाबदार असेल. याकरीता कोणत्याही परिस्थितीमध्ये ग्राहक जबाबदार असणार नाही. त्याकरीता त्याने आवश्यक विमाकवच उतरविले पाहीजे. या करणास्तव सेवेमध्ये खंड पडणार नाही व ग्राहकांस असुविधा होणार नाही याची हमी त्याने घेतली पाहिजे. |
| ८ | झेरॉक्स सेवा देणारा झेरॉक्स संबंधीत मशीन व इतर यंत्रसामग्री नियमीत अदयावत ठेवेल. झेरॉक्स मशीन किंवा संबंधीत यंत्रसामग्री मध्ये बिघाड झाल्यामुळे ग्राहकांना मिळणा-या झेरॉक्स सेवे मध्ये खंड पडणार नाही याची सेवा देणा-या संबंधीताने हमी घेणे आवश्यक आहे. सेवा प्रदात्याला त्याच्या खर्चाने यंत्रसामग्री दुरूस्ती व त्याकरीता लागणारे साहीत्य खरेदी करावे लागेल. |
| ९ | झेरॉक्स मशीन संबंधीत सेवा ही सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत नियमीत कामाच्या दिवशी देणे बंधनकारक राहील. तसेच ग्राहकाला आवश्यक असल्यास रविवार आणि सुटीच्या दिवशी/ सामान्य कामकाजाच्या वेळेच्या पलीकडे सांगीतलेली सेवा प्रदान |

| | |
|---|---|
| | करावी लागेल.त्यासाठी सेवा प्रदात्याला कोणतेही अतिरीक्त शुल्क आकारता येणार नाही. |
| १० | कराराच्या कालावधीत झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था हीने ग्राहकास दर तीन महीन्यांनी एकून बिलाच्या रकमेच्या ३ टक्के सुट दयावी. |
| ११ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/ संस्था काढण्यात आलेल्या छायाप्रतींची दैनीक माहीती देईल तसेच दैनीक माहीतीचे खाते प्रत्येक महीन्याच्या शेवटी तपासल्या जाईल. त्याअधीन बिले/देयके काढण्यात येतील. |
| १२ | या कालावधीत सेवा प्रदाता इतर कोणत्याही पक्षाचे किंवा व्यक्तीचे फोटोकॉपी चे काम स्विकारणार नाही. किंवा हाती घेणार नाही. |
| १३ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्थांचे संबंधीत व्यक्तींकडून झेरॉक्स काढतांना मुळ दस्त ऐवजांशी छेडछाड करणार नाही/नुकसान पोहोचविणार नाही. तसे झाल्यास झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था त्याकरीता जबाबदार असेल. |
| १४ | झेरॉक्स करारासाठी झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था बिनशर्त बॅक गॅरंटी सादर करेल. |
| १५ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्थेला झेरॉक्स सेवेकरीता उपलब्ध करून दिलेली जागा ती खाली करून मागीतल्या नंतर ७ दिवसांचे आत खाली करून देईल. तो सदर जागेवर कोणत्याही प्रकारचा हक्क किंवा दावा सांगणार नाही. तसेच त्याकरीता कोणत्याही प्रकारची हुज्जत घालणार नाही/वाद निर्माण करणार नाही. |
| १६ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था यांना करार पूढे चालू ठेवावयाचा असल्यास तो चालू कराराची मुदत संपण्याच्या ९० दिवस आधी त्याची माहीती देईल तथापी, कराराचे नुतणीकरण करावयाचे किंवा कसे याचे अधिकार या संस्थेकडे/कार्यालय प्रमुखाकडे सुरक्षीत असेल. |
| १७ | दोन्ही पक्षांना एकमेकांना ३० दिवसाची लेखी सुचणा देवून करार रद्द करण्याचा अधिकार असेल असे झाल्यास प्रदाता झेरॉक्स युनीट चालविण्याकरीता दिलेली जागा कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण न करता खाली करून देईल. |
| १८ | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था या कराराच्या अनुषंगाने सेवा देत नसल्याचे निर्देशनास आल्यास किंवा त्याची सेवा असमाधान कारक वाटल्यास सदरचा करार हा मुदतीपूर्वी १ महीण्याची नोटीस देवून संपुष्टात आणण्याचा अधिकार कार्यालय प्रमुखाकडे/प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांचेकडे सुरक्षीत असेल. |
| १९ | झेरॉक्स मशीन सेवा संदर्भात वेळोवेळी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून प्राप्त निर्देश/सुचणा या झेरॉक्स मशीन सेवा देणा-या व्यक्ती/संस्था यांना बंधनकारक असेल. |
| २० | झेरॉक्स सेवा देणारी व्यक्ती/संस्था यांचे सोबत करण्यात आलेला करार हा जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती तसेच अधिनस्थ दुय्यम न्यायालय तसेच अमरावती न्यायिक जिल्हयातील संपूर्ण तालुका न्यायालय येथे झेरॉक्स संबंधीत सेवा देण्याकरिता करण्यात येईल. |